महाराष्ट्र टाइम्स

# 'एव्हीएन'वरील पहिली बोनसेल थेरपी यशस्वी

## देशामध्ये जहांगीर रुग्णालयात पहिले उपचार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस'(एव्हीएन) खुब्याच्या हाडांशी संबंधित या आजाराच्या रुग्णांवर देशातील पहिली बोनसेल (अस्थिपेशी) थेरपी पुण्यात यशस्वी करण्यात आली. या आजारावर 'ऑसग्रो' या पेशींवर आधारित पद्धतीने उपचार करण्यात आले. जहांगीर रुग्णालयातील सांधेरोपणतज्ज्ञ डॉ. आशिष अरबाट यांनी हे उपचार केले. 'ऑसग्रो' ही पेशींवर आधारित उपचारपद्धती सर्वप्रथम पुण्यात करण्यात आली. अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस या खुब्याच्या आजाराची सुरुवात व्यसन, चुकीची औषध पद्धती, हाडांची झीज झाल्यामुळे होते. जहांगीर रुग्णालयाचे सांधेरोपणतज्ज्ञ डॉ. आशिष अरबाट म्हणाले, 'कोपरगाव येथील ५० वर्षीय हेमंत बदादे खुब्याच्या सांध्याची झीज झाल्याने जहांगीर रुग्णालयात आले होते. त्यांच्या दोन्ही खुब्याच्या सांध्यांची तपासणी केली असता त्यांना 'एव्हीएन' हा आजार झाल्याचे निदान झाले. उजव्या बाजूच्या खुब्यावर 'बोनसेल' थेरपी ऑसग्रो पद्धतीने प्रत्यारोपण प्रक्रिया करण्यात आली.'

> बोनसेल थेरपीमध्ये प्रयोगशाळेत पेशींवर प्रक्रिया केली जाते. त्याची संख्या वाढवून त्या सक्रिय केल्या जातात. चार ते पाच आठवड्यांपर्यंत प्रक्रिया झाल्यानंतर पेशींची मोठ्या प्रमाणात निर्मिती होते. रुग्णाच्या आजाराची स्थिती पाहून त्यांना कोणत्या थेरपीचे उपचार द्यावेत याचा निर्णय घेण्यात येतो.
>
> **- डॉ. आशिष अरबाट,**
> सांधेरोपणतज्ज्ञ, जहांगीर रुग्णालय